महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

फोन : २४०७७४४१
ग्राम : पर्सनग्रीड, मुंबई
फॅक्स : २४०२५७६३

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,
माटुंगा, **मुंबई - ४०० ०१९.**

संदर्भ : साप्रवि/मावक/पदोन्नतीतील आरक्षण/

दिनांक :

## प्रशासकीय परिपत्रक क्र.१०८ दिनांक १९.५.२००७

विषय : **पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यांवर लागू करणेबाबत.**

संदर्भ : १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४३, दि. ३.१.२००५ व त्या सोबतचा शासन निर्णय क्र.बीबीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि. २५.५.२००४

२) साप्रवि/मावक/२९५९, दि.२.१.२००७

३) अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र.बीबीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि. १३.३.२००७

४) अवर सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र. संकीर्ण-२००६/(प्र.क्र.१५७२)/ऊर्जा-२ दि. ८.५.२००७

----

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र.बीबीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि. २५.५.२००४ अनुसार शासनाच्या सेवेत असलेल्या मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यांवर लागू केले आहे. सदरचे आदेश पूर्वीच्या म.रा.वि.मंडळाचे प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४३ दि. ३.१.२००५ अन्वये प्रसृत केलेले आहेत.

मध्यंतरीच्या कालावधीत श्री. विजय घोगरे व इतरांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ८४५२/२००४ दाखल करुन शासनाने घेतलेल्या निर्णयास आव्हान दिले आहे. या याचिकेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने "जैसे थे" चे आदेश दिले होते. सदर आदेशाच्या अनुषंगाने शासनाने निर्णय क्र.बीबीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि. १४.२.२००५ अन्वये दि. २५.५.२००४ च्या शासन निर्णयान्वये होणा-या पदोन्नतीच्या कार्यवाहीस "जैसे थे" ठेवण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर शासनाने शासन निर्णय क्र.बीबीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि. २४.८.२००६ अन्वये मा.उच्च न्यायालयाकडून देण्यात आलेल्या सुधारीत आदेशांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर पुन्हा शासन निर्णय क्रमांक २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दि. १०.११.२००६ अन्वये "जैसे थे" चे

आदेश दिले व ते या कार्यालयाचे पत्र क्र. साप्रवि/मावक/२९५९ दि. २.१.२००७ अन्वये संबंधित क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात आले होते.

आता, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी या संदर्भात सिव्हील ॲप्लीकेशन क्रं.३१३०/०६, १७८३/०६, २२८३/०६ आणि १३४/०७ (इन रिट पिटीशन क्र. ८४५२/०४) वर एकत्रित सुनावणी घेऊन दि.९.३.२००७ रोजी आदेश देऊन सदर सिव्हील ॲप्लीकेशन्स् निकालात काढली आहेत.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशान्वये तसेच अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय यांचे पत्र क्र. शासन निर्णय क्र.बीबीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि. १३.३.२००७ व अवर सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र. संकीर्ण-२००६ (प्र.क्र.१५७२)/ऊर्जा-२ दि. ८.५.२००७ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार **"पदोन्नती देताना खुल्या प्रवर्गाची ६७ टक्के, अनुसूचित जाती प्रवर्गाची १३ टक्के व अनुसूचित जमाती प्रवर्गाची ७ टक्के या प्रमाणे पदोन्नतीची पदे भरण्यात यावीत. उर्वरित विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाची ११ टक्के व विशेष मागास प्रवर्गाची २ टक्के अशी एकूण १३ टक्के आरक्षणाची पदे याचिका क्र. ८४५२/०४ निकाली निघेपर्यंत रिक्त ठेवण्यात यावीत व सर्व पदोन्नत्या देताना मुळ याचिका क्रमांक ८४५२/०४ च्या निर्णयाच्या अधिन राहून कराव्यात व पदोन्नतीच्या आदेशामध्ये तसा स्पष्ट उल्लेख करावा."**

वरील शासन निर्णय मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करुन प्रसृत करण्यास मंजूरी दिली आहे.

सोबत : दि. १३.३.२००७ व
दि. ८.५.२००७ च्या
शासन निर्णयांच्या प्रती.

**मुख्य महाव्यवस्थापक (तां./आस्था.)**

प्रति,

प्रेषण यादीप्रमाणे
कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत

# महाराष्ट्र शासन

क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब.
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र.२२०२५१७७
दिनांक : १३/३/२००७

प्रति,

अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

विषय : पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यांवर लागू करणेबाबत.

संदर्भ : १) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र. .बीसीसी-२००१/१८८७/ प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक २५/५/२००४,
२) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र. .बीसीसी-२००१/१८८७/ प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक १४/२/२००५,
३) शासन पत्र, सा.प्र.वि.क्र. .बीसीसी-२००४/प्र.क्र.११८/ ०४/१६-ब. दिनांक १४/७/२००५.
४) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र. .बीसीसी-२००१/१८८७/ प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक २४/८/२००६,
५) शासन पत्र, सा.प्र.वि.क्र. .बीसीसी-२००१/१८८७/ प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक २४/८/२००६,
६) शासन पत्र क्रमांक बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक : ३/१०/२००६
७) शासन पत्र क्रमांक बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक : १०/११/२००६

महोदय/महोदया,

मा.सर्वोच्च न्यायालयाने Special Leave to Appeal (Civil) No (s) १६४८५/२००६ च्या अनुषंगाने दिनांक ६/११/२००६ रोजी मा.उच्च न्यायालयातील प्रकरणावर निर्णय होईपर्यंत खुल्या प्रवर्गातील त्याचबरोबर अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागासवर्ग यांच्या पदोन्नत्या संदर्भात " जैसे थे " ठेवण्याचे आदेश दिलेले होते. सदर आदेशास

अनुसरुन सर्व पदोन्नत्या संदर्भातील कार्यवाही पुढील आदेश होईपर्यंत " जैसे थे " ठेवण्यात यावी असे आदेश संदर्भ क्र.७ वरील दिनांक १०/११/२००६ च्या पत्रान्वये दिलेले होते.

२. मा.सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक ६/११/२००६ च्या आदेशानुसार अर्जदाराला दिनांक ६/११/२००६ पासून म्हणजेच आदेशाच्या दिनांकापासून दोन आठवड्याच्या आत मा.उच्च न्यायालयात सुधारीत अर्ज दाखल करण्याचेही निर्देश दिलेले होते. त्यानुसार अर्जदारांनी मा.उच्च न्यायालयात Civil Application क्रमांक १३४ / २००७ (इन रिट पिटीशन क्रमांक ८४५२/०४) दाखल केलेले होते. मा.उच्च न्यायालयाने या विषयाच्या अनुषंगाने प्रलंबित असलेल्या Civil Application क्र.३२३०/२००६, क्र.१७८३/०६ व २२८३/०६ आणि क्र.१३४/२००७ (Writ Pitition क्रमांक ८४५२/०४) वर एकत्रित सुनावणी घेवून दिनांक ९/३/२००७ रोजी खालीलप्रमाणे आदेश देवून सदरहू Civil Applications निकालात काढलेले आहेत.

(अ) It is clarified that the promotions that we have permitted to be made by this order are only in relation to the State Government employees and on similar lines establishments of the instrumentalities of the State, which are covered by Article 12 of the Constitution of India could also be permitted to effect promotion and this order does not apply to other establishments, which are covered by the definition of Establishment in Section 2 of the Act. To that extent the status quo shall be maintained.

(ब) We accordingly permit the state Government to fill up the promotional posts to the extent of 67 % from the open category, 13 % from Scheduled Caste and 7 % from Scheduled Tribe Category . So far as 20 % of Scheduled Caste and Scheduled Tribe post are concerned, the creamy layer concept shall not be made applicable. The balance 13 % seats however, shall be kept vacant pending the hearing and final disposal of the writ petition. It is clarified that this arrangement is made subject to the result of the petition . Civil Applications are disposed of the above terms .

३. मा.उच्च न्यायालयाचे वरील आदेश लक्षात घेता आता खुल्या प्रवर्गाची ६७% , अनुसूचित जाती प्रवर्गाची १३% , व अनुसुचित जमाती प्रवर्गाची ७ % या प्रमाणे पदोन्नतीची पदे भरण्यात यावीत. उर्वरित विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाची ११% व विशेष मागास प्रवर्गाची २% अशा एकूण १३ % आरक्षणाची पदे याचिका क्र.८४५२/०४ निकाली निघेपर्यंत रिक्त ठेवण्यात यावीत.

४. उपरोक्त सर्व पदोन्नत्या या मूळ याचिका क्रमांक ८४५२/०४च्या निर्णयाच्या अधीन राहून कराव्यात व पदोन्नतींच्या आदेशामध्ये तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

(५)

५. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय / निमशासकीय इत्यादी कार्यालयांना वरील परिच्छेद २ (अ) मध्ये दिलेल्या निर्देशांच्या अधिन राहून आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना द्याव्यात.

६. सदर पत्र महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २००७०३१३१६०७३८००१ असा आहे.

आपला,

(गो.आ.लोखंडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :**

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
उप संचालक, अनुसूचित जाती/जमाती आयोग भारत सरकार, पिपळूणकर भवन, शास्त्री मार्ग, ताबे पेठ, पुणे - ४११ ०३०.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, समाज कल्याण, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ ( लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई / नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ ( लेखा परीक्षा ), मुंबई / नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

(६)

महाराष्ट्र शासन

क्रमांक: संकीर्ण-२००६/(प्र.क्र. १५७२)/ऊर्जा-२,
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: ८.५.२००७

प्रति,

व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत सूत्रधार कंपनी लि.,
प्रकाशगंगा, वांद्रा (पूर्व), मुंबई

व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.,
प्रकाशगड, वांद्रा (पूर्व), मुंबई

व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि.,
प्रकाशगड, वांद्रा (पूर्व), मुंबई

व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि.,
प्रकाशगड, वांद्रा (पूर्व), मुंबई

**विषय:** पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यांवर लागू करणेबाबत.

**संदर्भ :** १) मुख्य महाव्यवस्थापक (मासं),महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि.,यांचे क्रमांक: मासंत्रि/आस्था-०३७२१, दि. १० एप्रिल,०७ चे पत्र
२) मुख्य महाव्यवस्थापक (ता/आस्था ),महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., यांचे क्रमांक: साप्रवि/मावक-२०१४८, दि. ३/५/०७ चे पत्र
३) मुख्य महाव्यवस्थापक (मासं),महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि., यांचे क्रमांक: मासं/ मुम-६६५०, दि. ४ मे,०७ चे पत्र

२. शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्र. बिसीसी-०१/१८८७/ प्र.क्र.६४/ ०१ १६ क, दि. १३.३.०७ नुसार पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर लागू करण्याबाबत उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या स्पेशल लिव्ह अपिल ( सिव्हील) क्रमांक १६४८५ /२००६ मध्ये उच्च न्यायालयाने सिव्हील एप्लीकेशन क्र.३१३०/०६, १७८३/०६,२२८३/०६ आणि १३४/०७ ( इन रिट पिटीशन क्र. ८४५२/०४) मध्ये एकत्रित सुनावणी घेवून, दि. ९.३.०७ रोजी दिलेले आदेश प्रसृत केले आहेत.

३. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशानुसार घटनेच्या परिच्छेद १२ अंतर्गत अंतर्भूत असलेल्या आस्थापना वगळून अन्य आस्थापना ज्या राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य लोकसेवा ( अजा, अज, विज,भज,विमाप्र आणि इतर मागासवर्गीयासाठी आरक्षण)अधिनियम, २००१ च्या कलम २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अंतर्भूत असतील त्या आस्थापनाना सदरहू स्थगिती आदेश कायम ठेवण्याचे मा.उच्च न्यायालयाने निदेश दिलेले आहेत. तिन्ही विद्युत कंपन्यामधील आस्थापना राज्य घटनेच्या परिच्छेद १२ मध्ये अंतर्भूत आहेत किंवा कसे हा प्रश्न निर्माण झाला.

४. या अनुषंगाने तिन्ही विद्युत वितरण कंपन्यामार्फत त्यांच्या कायदेशीर सल्लागारांची तसेच असोसिएट ॲडव्होकेट जनरल श्री. कुंभकोणी यांचे अभिप्राय प्राप्त करुन घेतले असता असोसिएट ॲडव्होकेट जनरल श्री. कुंभकोणी यांनी असे अभिप्राय दिलेले आहेत की, पूर्वाश्रमीचे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ हे राज्य शासनाच्या अखत्यारितील मंडळ होते व मंडळाची आस्थापना घटनेच्या परिच्छेद १२ अंतर्गत अंतर्भूत होत्या. त्यानंतर सन २००५ मध्ये विद्युत अधिनियम २००३ च्या तरतूदी लागू झाल्यानंतर या कायद्याच्या कलम १३१ नुसार ३ नवीन विद्युत कंपन्या अनुक्रमे १) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., २) महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि., ३) महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि., आस्थापित झालेल्या आहेत. या तिन्ही विद्युत कंपन्यावर राज्य शासनाची मालकी असल्यामुळे तसेच याबाबत वेळोवेळी उच्च व सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायालयीन निर्णयांचा अभ्यास करता या तिन्हीही कंपन्यांच्या आस्थापना राज्य घटनेच्या कलम १२ अंतर्गत अंतर्भूत होतात त्यामुळे या तिन्ही कंपन्याना उच्च न्यायालयाने दिलेल्या दि. ९.३.०७ च्या निर्णयानुसार पदोन्नतीसाठी दिलेली स्थगिती उठविण्यास हरकत नाही.

५. ॲडीशनल ॲडव्होकेट जनरल यांच्या अभिप्रायावर विधी व न्याय विभागाचे मत विचारात घेऊन तीन्ही विद्युत कंपन्यांना असे कळविण्यात येते की, मुंबई उच्च न्यायालयाने सिव्हील एप्लीकेशन क्र.३१३०/०६, १७८३/०६,२२८३/०६ आणि १३४/०७ ( इन रिट पिटीशन क्र. ८४५२/०४) मध्ये दिनांक ९.३. २००७ रोजी पदोन्नतीसाठी दिलेली स्थगीती उठविण्यास दिलेली मंजूरी तिन्ही कंपनीमधील अधिकारी / कर्मचारी वर्गासाठी देखील लागू करण्यात येत असून राज्य शासन वेळोवेळी जे आरक्षण धोरण अमलात आणेल ते अंमलात आणण्याच्या अटीवर

पदोन्नतीसाठी देण्यात आलेली स्थगिती उठविण्यास पुढीलप्रमाणे अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

पदोन्नती देताना खुल्या प्रवर्गाची ~~३७~~ ६७ टक्के, अनुसूचित जाती प्रवर्गाची १३ टक्के व अनुसूचित जमाती प्रवर्गाची ७ टक्के या प्रमाणे पदोन्नतीची पदे भरण्यात यावीत. उर्वरित विमुक्त व भटक्या जमाती प्रवर्गाची ११ टक्के व विशेष मागास प्रवर्गाची २ टक्के अशा एकूण १३ टक्के आरक्षणाची पदे याचिका क्रमांक ८४५२/०४ निकाली निघे पर्यंत रिक्त ठेवण्यात यावीत व सर्व पदोन्नत्या देताना मुळ याचिका क्रमांक ८४५२/०४ च्या निर्णयाच्या अधीन राहून कराव्यात व पदोन्नतीच्या आदेशामध्ये तसा स्पष्ट उल्लेख करावा.

( मोहन पांढरकामे)
शासनाचे अवर सचिव